नेत्रदानाबाबत जागरूकता वाढवणं आवश्यक

भारतातल्या दृष्टीहीनांची संख्या लाखोच्या घरात आहे. त्यांना दृष्टी मिळावी यासाठी अनेक संस्था, हॉस्पिटल्स बरीच धडपड करत आहेत. ठाण्यातल्या डॉ. वावीकर यांचंही या क्षेत्रातलं कार्य उल्लेखनीय आहे. अत्याधुनिक सुविधांनी सज्ज असलेली डॉ. वावीकर आय इन्स्टिट्युट ही संस्था दृष्टीहीन तसंच डोळ्यांच्या समस्या असणाऱ्या रुग्णांसाठी वरदानच म्हणावी लागेल.

डॉ. वावीकर

आपल्या या संस्थेबद्दल डॉ. वावीकर सांगतात,

'भारतात मुख्यतः नेत्रदानाबाबत जागरूकता वाढवणं फार महत्त्वाचं आहे. त्यासाठी आम्ही वेळोवेळी उपक्रम राबवत असतो. शाळा, कॉलेज, ऑफिसेस, कष्टाचं काम करणारे कामगार तसंच सामाजिक संस्था यांच्या मदतीने याला हळूहळू चांगला प्रतिसाद मिळत आहे.

मला एक अनुभव सांगायला आवडेल, मुरबाड इथे एक कॅम्प आयोजित केला होता. तिथे १०९ ऑपरेशन्स करायची होती. पण त्यापैकी तीन रुग्णांची आर्थिक परिस्थिती इतकी हलाखीची होती की कॅम्पला येण्यासाठी अडीच रुपये भाडंही ते भरू शकत नव्हतं. त्यामुळे आम्ही त्यांच्या घरी जाऊन त्यांची ऑपरेशन केली. अशा अनेक गरीब आणि गरजूंसाठी एक पर्याय आणि चांगली आरोग्यसेवा देण्याचं माझं उद्दिष्ट्य होतं. ते या आय इन्स्टिट्युटमधून साध्य करण्याचा मी प्रयत्न करत आहे.'

ते पुढे म्हणाले, 'आपल्या देशात रुग्णांना कौन्सेलिंग करणं आवश्यक आहे. ते इथे होताना दिसत नाही. भारतीय लोक भावनिक असल्याने त्यांना समजावणं अवघड नाही मात्र जागरूकता वाढवणं महत्त्वाचं आहे. श्रीलंकेत आपल्याहून १० पटीने अधिक प्रमाणात नेत्रदान होते. वेळप्रसंगी त्या देशातून आपण मदतही घेतो.

सध्याची लाइफस्टाइल आणि वाढत्या डायबेटिसमुळे डोळ्यांचे आजार वाढत आहे. ग्लोकोमासारखा आजार कोणतीही पूर्वसूचना न देताच चोरपावलांनी येतो. अशा अनेक आजारांचं वेळीच निदान होऊन त्यावर उपचार करणं आवश्यक आहे. आपल्या डोळ्यांचा स्क्रिन टाइम ठरलेला असतो. त्याची काळजी घ्या. मॉडर्न लाइफस्टाइलमुळे येणाऱ्या अतिताणाच्या समस्या वाढत आहे. वयाच्या १० व्या वर्षापर्यंत आणि ४० शी नंतर डोळे वेळोवेळी चेक करणं अत्यावश्यक आहे.'

ऑप्टोमेट्री हा विद्यार्थ्यांसाठी करिअरचा चांगला पर्याय आहे. १० वी आणि १२ वी च्या विद्यार्थ्यांना हा कोर्स करता येतो. डिग्री मिळाल्यावर चांगली नोकरीही मिळते. एखाद्या संस्थेत ऑप्टोमेट्रीच्या ८ जागा असल्या तर त्यासाठी एकच विद्यार्थी मिळतो. 'त्यामुळे या क्षेत्राचा विचार करावा, असा सल्ला डॉ. वावीकरांनी दिला.

ते पुढे म्हणाले, 'इंदिराबाई चॅरिटेबल ट्रस्ट'तर्फे आम्ही अगदी कमी खर्चात ऑपरेशन करतो. काही वेळेला काही ऑपरेशन्स विनामोबदलाही करावी लागतात. Lensx हे डोळ्यांचं मशीन पूर्ण महाराष्ट्रात फक्त डॉ. वावीकर इन्स्टिट्युटमध्येच आहे. त्याचा रुग्णांना मोठ्या प्रमाणात उपयोग होत आहे. परदेशातूनही अनेक रुग्ण इथे उपचारांसाठी येत आहेत. दृष्टीहीनांना हे सुंदर विश्व दाखवणं हेच माझं मुख्य उद्दिष्ट्य आहे.'

डॉ. वावीकर आय इन्स्टिट्युटतर्फे वरिष्ठ नागरिकांसाठी 'जॉयफुल लिव्हिंग, ग्रेसफुल एजिंग' हा उपक्रम दर तीन महिन्यांनी राबवत जातो. यात डोळ्यांची काळजी कशी घ्यावी तसंच डोळ्याच्या आरोग्याच्या विविध समस्यांविषयीही माहिती दिली जाते.

- शरद पवार
mtartnedit@indiatimes.com